—:नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४४/२००७ मधील निशाणी ९९ वरील आदेशः—

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी निशाणी ९६ वर या न्यायालयाने केलेल्या आदेशाचे पुनरावलोकन होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. या अर्जास विरोध करुन प्रतिवादीने निशाणी १०३ ला म्हणणे दाखल केल आहे. त्यामध्ये वादीचा अर्ज फेटाळणेत यावा अशी जोरदार हरकत घेतली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तिवाद सविस्तर ऐकणेत आला व अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन करणेत आले.

४. वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांच्या युक्तिवादावरुन आणि अभिलेखावरील कागदपत्रांवरुन वादी यांनी दिलेले अर्ज निशाणी ९६ आणि ९९ हे अर्ज ‘‘मागच्यावेळी आपण ख्रिश्चन धर्म स्विकारला आहे असे सांगितले आहे’’ या आलेल्या पुराव्यावरुन दाखल आहेत. वादी यांचे वकील श्री. कुंटे यांनी हा प्रश्न प्रतिवादी यांच्या वकीलांनी मोघम विचारला आहे आणि त्यावेळी वादीचा साक्षीदार हा गोंधळलेला होता असा युक्तिवाद केला आणि निशाणी ९९ अर्जाचे पुनरावलोन करुन निशाणी ९६ प्रमाणे वादीस फेरतपास या प्रश्नापुरती करण्यास परवानगी द्यावी अशी विनंती केली. वादी यांच्या वकीलांनी पुढे युक्तिवाद केला की, या न्यायालयाने पारीत केलेल्या निशाणी ९६ मधील आदेशामध्ये चूक झाली आहे, तरी आदरपूर्वक या गोष्टीचा विचार होवून निशाणी ९९ हा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली. याउलट प्रतिवादीचे वकील सौ. रांगणेकर/सावंत यांनी वादीचे साक्षीदार यास दि. ०२/०२/२०१० रोजी उलटतपासामध्ये ‘‘गेल्या वर्षापासून मी हिंदूंचे कोणतेही सण करीत नाही’’ या पुराव्याकडे लक्ष वेधले. त्यांनी युक्तिवाद केला की, त्यावेळी प्रतिवादी तर्फे या साक्षीदाराला पुढचा प्रश्न ‘‘तुम्ही कॅथॉलिक धर्म स्विकारला आहे का ?’’ असा प्रश्न विचारला होता, त्यावेळी साक्षीदाराने उत्तर ‘‘होय’’ असे दिले होते. परंतु तत्कालीन न्यायालयाने तो प्रश्न घेण्यास अनुमती दिली नव्हती. प्रतिवादीच्या वकीलांनी याअनुषंगाने त्यांनी दिलेला निशाणी ६३ चा

अर्ज याकडे न्यायालयाचे लक्ष वेधले. या अर्जाचे अवलोकन केले असता हा अर्ज दि. २२/०३/२०१० रोजी तत्कालीन न्यायालयाने कारणे देवून नाकारला आहे. तथापि या अर्जामध्ये प्रतिवादीच्या वकीलांनी वादीच्या साक्षीदाराला कॅथॉलिक धर्म स्विकारला आहे का ? असे विचारले होते त्यावेळी वादीच्या वकीलांनी हरकत घेतली होती आणि प्रतिवादी यांचे त्याच्या कैफियतीमध्ये कथन (pleading) नव्हते, म्हणून अर्ज नाकारणेत आला असे अवलोकन केले आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, प्रतिवादीच्या वकीलांनी वादीच्या साक्षीदाराला ''तुम्ही कॅथॉलिक धर्म स्विकारला आहे का ?'' व त्याला दिलेले उत्तर या गोष्टी या अगोदरच तत्कालीन न्यायालयाचे समोर झालेल्या होत्या.

५. त्यानंतर प्रस्तुतचे प्रकरण या न्यायालयासमोर दि. २३/०७/२०१४ रोजी या साक्षीदाराचा उलटतपास नोंदविण्यासाठी आले होते. दरम्यानच्या काळामध्ये प्रतिवादी नं. ४ तर्फे निशाणी ६५ ला दि. २३/०३/२०१० रोजी कैफियत दाखल आहे. त्यामध्ये वादीने हिंदू धर्माचा त्याग करुन ख्रिश्चन धर्म स्विकारला आहे असा बचाव घेतला आहे. अशा परिस्थितीत दि. २३/०७/२०१४ रोजी वादीच्या साक्षीदाराचा उलटतपास नोंदविणेत आला, त्यामध्ये मागच्या वेळी मी जबानीत ख्रिश्चन धर्म स्विकारला आहे असे सांगितले आहे हे मान्य केले आहे. वास्तविक या साक्षीदाराची साक्ष या न्यायालयाने वादीचे वकील व पक्षकार यांच्या समक्ष खुल्या न्यायालयात दिली आहे आणि वादीची साक्ष याच न्यायालयाने नोंदविलेली होती, त्यावेळी साक्षीदाराला प्रश्न गोंधळण्यासारखा होता अगर कळला नव्हता, अगर तो प्रतिवादीच्या वकीलांनी फसवणारा टाकला होता अशी कोणतीही गोष्ट स्पष्ट झाली नव्हती. त्यामुळे वादी यांनी दिलेला पुनरावलोन करण्याचा अर्ज मंजूर होणेस पात्र ठरत नाही.

६. ''मागच्या वेळी तुम्ही जबानीत ख्रिश्चन धर्म स्विकारला आहे असे सांगितले होते ?'' हा प्रश्न प्रतिवादीच्या वकीलांनी पूर्वीच्या उलटतपासणीच्या अनुषंगाने साक्षीदाराला विचारलेला आहे. याअनुषंगाने निशाणी ६३ मध्ये सविस्तर स्पष्टीकरण आहे व तत्कालीन न्यायालयाचे अवलोकन सुध्दा त्याअनुषंगाने आहे.

वास्तविक त्यावेळी उपलब्ध असलेल्या कैफियतीवरुन प्रतिवादींना असा प्रश्न विचारण्याचा अधिकार येत नव्हता, त्यामुळे न्यायालयाने तो प्रश्न नाकारला होता असे दिसून येते. मात्र दरम्यानच्या काळामध्ये इतर प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर आल्याने हाच प्रश्न प्रतिवादींना दि. २३/०७/२०१४ रोजी विचारण्याचा अधिकार येतो आणि या कारणामुळे निशाणी ९६ हा वादी यांनी दिलेला अर्ज नामंजूर करणेत आला होता अशी वस्तूस्थिती दिसून येते. या न्यायालयाने पारीत केलेला निशाणी ९६ वरील आदेश याचे अवलोकन केले असता या आदेशामध्ये कोणतीही चूक अगर संदिग्धता आहे असे दिसून येत नाही. त्यामुळे वादी यांनी दिलेला अर्ज निशाणी ९९ हा मंजूर होण्यास पात्र ठरत नाही.

७. वादी यांच्या वकीलांनी **श्रीमती गंगूबाई व इतर विरुध्द रतनकुमार आणि इतर, ए.आय.आर. १९८३, बॉम्बे २९१** या न्यायनिवाडयाचा आधार घेवून निशाणी ९९ अर्ज पुनरावलोन करता येईल असा युक्तिवाद केला. या न्यायनिवाडयाशी हे न्यायालय सहमत आहे, तथापि वरील विवेचनावरुन या न्यायालयाने केलेला आदेश हा कोणत्याही कायद्या विरुध्द नाही अगर त्यामध्ये कोणतीही चूक नाही अशा गोष्टी आढळून येत असल्याने उपरोक्त न्यायनिवाडा लागु पडत नाही.

८. वरील विवेचनावरुन वादी यांनी दिलेला निशाणी ९९ चा अर्ज हा मंजूर होणेस पात्र ठरत नसल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**—: आ दे श :—**

१. अर्ज निशाणी ९९ नामंजूर करणेत येत आहे.

२. खर्चाबाबत काही हुकूम नाही.

कुडाळ,
दिनांक : ०१/०१/२०१५.

( ए. पी. मोहिते )
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ.